निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शनिवार
३१ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३३५ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# सुनेत्रा पवार होणार राज्याच्या नव्या उपमुख्यमंत्री, आज ५ वाजता पार पडणार शपथविधी

**मुंबई/** अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी विराजमान होणार आहेत.



आज म्हणजेच शनिवारी त्यांचा शपथविधी पार पडणार आहे. उद्या संध्याकाळी ५ वाजता सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. सुनेत्रा पवार यांच्या रुपात महाराष्ट्राला पहिल्या महिला उपमुख्यमंत्री मिळणार आहेत. दरम्यान सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीच्या तयारीसाठी स्वर्गीय अजित पवारांची प्रशासकीय टीम बारामतीहून मुंबईकडे रवाना झाली आहे. सुनेत्रा पवार सकाळी ८ वाजता बारामतीहून स्पेशल हेलिकॉप्टरने मुंबईला रवाना होणार आहेत.

शपथविधी होण्याआधी दुपारी २ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाची निवड करण्यासाठी बैठक पार पडेल. या बैठकीत सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली जाईल. त्यानंतर सुनेत्रा पवार यांचा शपथविधी पार पडेल.

**'मुख्यमंत्र्यांना कळवला जाणार निर्णय'**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्या दुपारी २ वाजता विधीमंडळ पक्षाची बैठक होणार आहे. सुनेत्रा पवारांशी आम्ही रात्री संवाद साधणार आहोत. पक्षाचे विधानसभा, विधानपरिषद सदस्य आणि खासदार उपस्थित राहतील. जो निर्णय घेऊ त्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना कळवण्यात येईल. पक्षाच्या प्रमुख नेत्यांनाही हजर राहण्यास सांगण्यात आलं आहे.

**आज ५ वाजता सुनेत्रा पवार घेणार शपथ**

आज म्हणजेच शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाची निवड करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार या बैठकीला उपस्थित असतील. या बैठकीत सुनेत्रा पवारांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली जाईल. यानंतर पक्षाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवडीचे पत्र दिले जाणार आहे.

ही निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रीपदाचा शपथविधी पार पडणार आहे. या शपथविधीसाठी कोणतीही जय्यत तयारी केली जाणार नसून, अत्यंत साधेपणाने तो पार पडेल अशी माहिती आहे. या शपथविधीनंतर सुनेत्रा पवारांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश होईल.

**छगन भुजबळांनीही दिली होती शपथविधीची कल्पना**

दादा गेले आणि ज्या पद्धतीने ते गेले त्यामुळे सर्वांची झोप उडाल्यासारखं झालं आहे. आता कोणाकडे तरी सर्व जबाबदारी देऊन पक्ष किंवा सरकार चालवावं तर लागणार आहे. विधीमंडळाच्या सदस्यांची उद्या बैठक बोलावली आहे. त्याच्यात विधिमंडळ पक्षनेतेपद जे अजित पवारांकडे होतं ते देण्यासंदर्भात निर्णय होईल. सुनेत्राताईंकडे पद द्यावं अशी अनेकांची मागणी आहे आणि ते चूक आहे असं वाटत नाही. पण निर्णय बैठकीत होईल, असं छगन भुजबळ यांनी सांगितलं आहे.

अजित पवार राष्ट्रवादीसंदर्भातील कामांवर आम्ही लक्ष देत आहोत सांगताना त्यांनी आपल्याला १४ बैठका झाल्याची काही कल्पना नसल्याचं म्हटलं. ते म्हणाले, उपमुख्यमंत्रीपदाची जागा रिकामी आहे ती, सुनेत्रा वहिनींच्या माध्यमातून कशी भरता येईल याकडे लक्ष आहे. पक्ष ठरवेल त्याप्रमाणे निर्णय होईल. उद्या विधिमंडळ पक्षनेता ठरवला जाईल आणि कदाचित एकमत झालं आणि प्रक्रिया झाली तर उद्याच शपथविधीही होऊ शकतो.

## सुनेत्रा पवारांच्या शपथविधीवर उच् देवेंद्र फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले 'माझ्याशी दोन वेळा...'

सुनेत्रा पवार राज्याच्या नव्या उपमुख्यमंत्री होणार यावर आता शिक्कामोर्तब झालं आहे. अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे रिक्त झालेल्या या पदावर सुनेत्रा पवार विराजमान होणार असून, शनिवारी संध्याकाळी ५ वाजता शपथविधी पार पडणार आहे. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीच्या तयारीसाठी स्वर्गीय अजित पवारांची प्रशासकीय टीम बारामतीहून मुंबईकडे रवाना झाली आहे. सुनेत्रा पवार सकाळी ८ वाजता बारामतीहून स्पेशल हेलिकॉप्टरने मुंबईला रवाना होणार आहेत. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथविधीवर प्रतिक्रिया दिली आहे.

सुनेत्रा पवारांच्या शपथविधीसंदर्भात विचारण्यात आलं असता ते म्हणाले की, जो काही निर्णय घ्यायचा असेल तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घेईल. आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जो निर्णय घेईल त्याच्या पाठीशी आम्ही सरकार आणि भाजपा म्हणून उभे राहू. अजित पवारांचं कुटुंब असेल किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल त्यांच्या पाठीशी आम्ही उभे आहोत. त्यांचे जे काही निर्णय होतील, त्या निर्णयांना योग्य ते समर्थन आमच्याकडून असेल.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून काही प्रस्ताव आला का? असं विचारलं असता ते म्हणाले की, माझ्याशी दोन वेळा चर्चा करुन ते गेले आहेत. त्या चर्चेत त्यांनी काय कार्यपद्धती आहे, काय पर्याय आहेत यासंदर्भात चर्चा केली आहे. पण अंतिम निर्णय त्यांच्या पक्षाचा असेल.

अर्थसंकल्प कोण सादर करणार? या प्रश्नावर त्यांनी उत्तर दिलं की, अजित पवारांनी अर्थसंकल्पाची भरपूर तयारी केली होती. उद्यापासून मी स्वत: लक्ष घालून अर्थसंकल्पाच्या ज्या प्रक्रिया आहेत त्या पूर्ण करणार आहे आणि त्यानंतर काय ते ठरवू.

**आज ५ वाजता सुनेत्रा पवार घेणार शपथ**

उद्या म्हणजेच शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाची निवड करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार या बैठकीला उपस्थित असतील. या बैठकीत सुनेत्रा पवारांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली जाईल. यानंतर पक्षाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवडीचे पत्र दिले जाणार आहे. ही निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रीपदाचा शपथविधी पार पडणार आहे.

**'दुपारी २ वाजता विधीमंडळ पक्षाची बैठक'**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्या दुपारी २ वाजता विधीमंडळ पक्षाची बैठक होणार आहे. सुनेत्रा पवारांशी आम्ही रात्री संवाद साधणार आहोत. पक्षाचे विधानसभा, विधानपरिषद सदस्य आणि खासदार उपस्थित राहतील. जो निर्णय घेऊ त्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना कळवण्यात येईल. पक्षाच्या प्रमुख नेत्यांनाही हजर राहण्यास सांगण्यात आलं आहे.

## जिल्हा परिषदेच्या निवडणुका पुढे ढकलल्यानं शिक्षक अडचणीत, केंद्रीय C-TET परीक्षा आणि निवडणुका एकाच वेळी

**सातारा :** राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका पुढे ढकलल्याने शिक्षक अडचणीत आले आहेत. शिक्षकांची उ-ढएढ ही परीक्षा देशभरात ७ आणि ८ तारखेला होणार आहे. निवडणुकीमुळं परीक्षा आणि निवडणूक ड्युटी एकाच वेळी आल्याने शिक्षक संभ्रमात पडले आहेत. परिक्षा द्यायची की निवडणूक ड्युटी करायची असा संभ्रम शिक्षकांमध्ये आहे.

**७ आणि ८ तारखेला C-TET परीक्षा**

केंद्रीय स्तरावरील ही परीक्षा असल्याने या १२ जिल्हा परिषद गटातील बहुतांशी शिक्षक या परीक्षेला बसलेले आहेत. दुसरीकडे एक प्रशिक्षण निवडणुकीचे झाल्याने आता या शिक्षकांची निवडणूक ड्युटी रद्द होणार का? की कारवाईला सामोरे जावे लागणार याबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. ३ तारखेला केंद्रप्रमुख परिक्षा आहे. ७ आणि ८ तारखेला उ-ढएढ परीक्षा आहे. दोन्ही परिक्षांची केंद्र जिल्ह्याबाहेर आहेत. सात आणि आठ तारखेला या परीक्षा सकाळी आठ वाजता सुरु होणार आहेत.

**निवडणुक आयोगाच्या एका निर्णयामुळे शिक्षक अडचणीत**

नगरपालिका निवडणुकीनंतर लगेचच जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झाल्याने इलेक्शन ड्युटी करीत दमछाक झालेले शिक्षक आता निवडणुक आयोगाच्या एका निर्णयामुळे अडचणीत सापडले आहेत. त्यांच्या नोकरीवर गदा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवस दुखवटा पाळण्यात येत आहे. त्यामुळे सध्या सुरु असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीवर त्याचा परिणाम झाला आहे. अजितदादा यांच्या निधन दुखवट्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका पुढे ढकलण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. आयोगाने जिल्हा परिषद निवडणुकांच्या तारखा बदलल्याने शिक्षकांची मोठी कोंडी झाली आहे. त्यांच्या नोकरीचा प्रश्न निर्माण झाला आहे. आधीच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी-बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा अन जिल्हा परिषद पंचायत समितीचे कर्तव्य एकाच वेळी आल्याने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये मोठा पेच निर्माण झाला आहे. दोन्ही कर्तव्य अत्यावश्यक सेवेत येत असल्याने नेमके प्राधान्य कशाला द्यावे, या विचारात शिक्षक अडकले आहेत. कामाचा ताण वाढल्याने शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मानसिक स्वास्थ्य हरवू लागले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारी २०२६ ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल.




## अजित पवारांच्या अनुपस्थितीत आता अर्थसंकल्प कोण सादर करणार? CM फडणवीस म्हणाले 'उद्यापासून मी स्वत:...'

**मुंबई/**अजित पवारांच्या अकाली निधनामुळे अर्थखात्याची जबाबदारी आता कोणाकडे जाणार यासंदर्भात वेगवेगळ्या चर्चा सुरु आहेत. राज्याच्या तिजोरीच्या चाव्या अजित पवारांनी अत्यंत सक्षमपणे हाताळल्या होत्या. त्यामुळे आता त्याच तोडीचा अर्थमंत्री शोधावा लागणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने हे पद आपल्याच पक्षाकडे राहावं यासाठी दावा केल्याचं समजत आहे. दुसरीकडे २३ फेब्रुवारीपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार असताना अर्थसंकल्प कोण सादर करणार? यावरुन संभ्रम आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. उद्यापासून मी स्वत: लक्ष घालून अर्थसंकल्पाच्या प्रक्रिया पूर्ण करणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.




अर्थसंकल्प कोण सादर करणार? या प्रश्नावर त्यांनी उत्तर दिलं की, अजित पवारांनी अर्थसंकल्पाची भरपूर तयारी केली होती. उद्यापासून मी स्वत: लक्ष घालून अर्थसंकल्पाच्या ज्या प्रक्रिया आहेत त्या पूर्ण करणार आहे आणि त्यानंतर काय ते ठरवू.

सुनेत्रा पवारांच्या शपथविधीवर उच् देवेंद्र फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले 'माझ्याशी दोन वेळा...'

सुनेत्रा पवारांच्या शपथविधीसंदर्भात विचारण्यात आलं असता ते म्हणाले की, जो काही निर्णय घ्यायचा असेल तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घेईल. आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जो निर्णय घेईल त्याच्या पाठीशी आम्ही सरकार आणि भाजपा म्हणून उभे राहू. अजित पवारांचं कुटुंब असेल किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल त्यांच्या पाठीशी आम्ही उभे आहोत. त्यांचे जे काही निर्णय होतील, त्या निर्णयांना योग्य ते समर्थन आमच्याकडून असेल.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून काही प्रस्ताव आला का? असं विचारलं असता ते म्हणाले की, माझ्याशी दोन वेळा चर्चा करुन ते गेले आहेत. त्या चर्चेत त्यांनी काय कार्यपद्धती आहे, काय पर्याय आहेत यासंदर्भात चर्चा केली आहे. पण अंतिम निर्णय त्यांच्या पक्षाचा असेल.

देवेंद्र फडणवीस सादर करणार अर्थसंकल्प?

अर्थसंकल्प तयार करण्यापूर्वी होणारा वेळ आणि प्रचंड मेहनत पाहता, फडणवीस २०२६-२७चा महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर करण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे महायुतीतील एका उच्चपदस्थ सूत्राने सांगितले आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर, मंत्रिमंडळात असे फारसे लोक नाहीत ज्यांना अर्थसंकल्पाच्या तयारी आणि सादरीकरणाचा अनुभव आहे. त्यामुळे, महाराष्ट्रात आर्थिक आणि आर्थिक तज्ज्ञ म्हणून ओळखले जाणारे फडणवीस यांच्यावर जबाबदारी येण्याची शक्यता आहे.

भाजपच्या एका वरिष्ठ मंत्र्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्याची जबाबदारी स्वीकारण्यासाठी फडणवीस हे सर्वात योग्य व्यक्ती आहेत. राज्याच्या अर्थव्यवस्थेचे आणि वित्तव्यवस्थेचे चांगले ज्ञान असण्यासोबतच ते राज्याच्या अर्थव्यवस्थेला निश्चित दिशा देऊ शकतात.

राज्याचे कर्ज ९.६ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे आणि एक लाख कोटी रुपयांच्या कल्याणकारी योजनांसाठी आर्थिक वचनबद्धता आहे - लाडकी बहिन योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज - हे अर्थसंकल्प एक कठीण काम असणार आहे. विशेषतः जेव्हा आर्थिक शिस्त राखणे आणि शेती, पायाभूत सुविधा आणि सामाजिक क्षेत्रे यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर दिलेली आश्वासने पाळणे येते.

राज्य विधानसभेत निवडून आलेले सदस्य (१९९९ ते २०१४) म्हणून फडणवीस यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय विश्लेषणात एक ठसा उमटवला होता.

पहिल्या टर्मचे मुख्यमंत्री म्हणून (फडणवीस यांनी महत्त्वाचे गृहखाते सांभाळले होते. त्यानंतर त्यांनी तत्कालीन पक्षाचे ज्येष्ठ मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना अर्थसंकल्पाचे वाटप केले होते.

# प्रतिमेचे भंजन आणि अगतिक राजकारण

महाराष्ट्राच्या राजकारणात काही नावे केवळ व्यक्ती नसून ती एक संस्था राहिली आहेत. शरद पवार हे त्यातील अग्रक्रमी नाव. दिल्लीच्या 'कॉन्स्टिट्यूशन क्लब'मध्ये एका माथेफिरू तरुणाने जेव्हा त्यांच्यावर हात उचलला होता.

तेव्हाचा तो काळ सोशल मीडियाचा नव्हता; पण त्या घटनेने अवघ्या महाराष्ट्राच्या अस्मितेला जी वेदना दिली होती, ती आजही अनेक जुन्या पिढीतील कार्यकर्त्यांच्या डोळ्यांसमोर ताजी असेल. मात्र, त्यावेळचा तो आदरयुक्त दरारा आणि आजची राजकीय परिस्थिती यात जे अंतर पडले आहे, ते 'प्रतिमा भंजन' या एका शब्दाने स्पष्ट होते.

**राजकीय संस्कृतीचा 'भस्मासूर'**

पुरातन कथेतील भस्मासुराचा दाखला आजच्या राजकारणाला तंतोतंत लागू पडतो. ज्या प्रवृत्तींना राजकारणात सोयीसाठी खतपाणी घातले गेले, ज्यांना 'अदृश्य' पाठबळ मिळाले, त्याच प्रवृत्ती आज उलटल्या आहेत. संभाजी भिडे यांनी शरद पवारांबद्दल काढलेले अत्यंत खालच्या पातळीवरील उद्गार आणि त्यांना 'देशद्रोही' म्हणण्यापर्यंत झालेली मजल, ही केवळ एका व्यक्तीची टीका नसून ती महाराष्ट्राच्या सुसंस्कृत परंपरेला लागलेली कीड आहे. पण दुर्दैव असे की, ज्या पुरोगामी महाराष्ट्राचा वारसा आपण अभिमानाने मिरवतो, तो वारसा जपणारेच आज संशयाच्या भोवऱ्यात आहेत.

**सोयीचे मौन आणि संभ्रमातील कार्यकर्ता**

सर्वात अनाकलनीय बाब म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे (अजित पवार आणि शरद पवार गट) असलेले मौन. ज्या शरद पवारांच्या राजीनाम्याच्या बातमीने ढसाढसा रडणारे जितेंद्र आव्हाड किंवा जयंत पाटील असतील, त्यांचे या विषयावर शांत राहणे हे सामान्य जनतेला बुचकळ्यात टाकणारे आहे.

रोहित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नीवर झालेल्या टीकेचा निषेध केला, ही महाराष्ट्राची 'संस्कृती' टिकवण्याच्या दृष्टीने चांगली पावले असली, तरी स्वतःच्या नेत्यावर होणाऱ्या विषारी हल्ल्यांविरुद्ध हे नेते मूग गिळून का बसले आहेत?

**हे मौन दोन शक्यता अधोरेखित करते:**

राजकीय तडजोडी: शरद पवार आणि अजित पवार पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चा आणि त्यामागची 'राजकीय अपरिहार्यता' कार्यकर्त्यांना संघर्षापासून रोखत आहे का?

उपयोगिता मूल्य: तुम्ही म्हटल्याप्रमाणे, 'उपयोगिता' संपली की समाज विसरू लागतो. राजकारण्यांनाही कदाचित हेच वाटू लागले आहे की, आता जुन्या जखमा उकरण्यापेक्षा सत्तेची गणितं महत्त्वाची आहेत.

**विसंगतीचा कळस**

छगन भुजबळ दोन वर्षांपूर्वी भिडेंच्या अटकेची मागणी करत होते, मात्र आज सत्तेत असताना तीच आक्रमकता कुठे हरवली, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

दुसरीकडे, ज्यांच्याशी राजकीय मतभेद टोकाचे आहेत, त्या अंबादास दानवेंनी (शिवसेना उबाठा) घेतलेली भूमिका ही राजकीय पक्षांपेक्षा व्यक्तीच्या सन्मानाची वाटते.

**समारोप**

महाराष्ट्र सध्या एका अशा वळणावर उभा आहे जिथे 'नेते' आपली प्रतिमा स्वतःच धूसर करत आहेत. फोडाफोडीचे राजकारण, तत्वशून्य युत्या आणि वैयक्तिक पातळीवर खाली घसरलेली टीका यामुळे सामान्य माणसाच्या मनातली राजकीय नेत्यांबद्दलची भीती आणि आदर दोन्ही संपले आहे.

भस्मासुराच्या डोक्यावर हात ठेवण्याची भीती आता केवळ पौराणिक राहिली नसून, ती महाराष्ट्राच्या मातीत प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. जेव्हा राजकीय अपरिहार्यता नैतिक मूल्यांपेक्षा मोठी होते, तेव्हा लोकशाहीचे मंदिर पोखरले जाऊ लागते.

### अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी मांडला आपला जीवनपट

## अभिनेता म्हणून जगताना मी स्वतःचाही अभिनय करतो ... - अभिनेते दिलीप प्रभावळकर

**आत्ताच एक्सप्रेस छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ माझे बहुआयामी व्यक्तिमत्त्व दिग्दर्शकांनी ओळखून त्यांनी मला दरवेळी वेगवेगळ्या भूमिका दिल्या. झपाटलेला चित्रपटातील 'तात्या विंचू', 'लगे रहो मुन्नाभाई'मधील महात्मा गांधी, 'दशावतार'मधील बाबुली मेस्त्री अशा अविस्मरणीय भूमिका मी या दिग्दर्शकांमुळे करू शकलो. त्यांनी माझ्यातला नट शोधत मला भूमिका साकारण्यास अभिनयाविषयीची भूमिका आणि लेखनाची वाटचाल अत्यंत प्रामाणिकपणे उलगडली.

पुढे बोलताना अभिनेते प्रभावळकर म्हणाले, शाळा आणि महाविद्यालय इतकाच माझा परीघ होता. रुईया महाविद्यालयाच्या 'जनावर' या एकांकिकेसाठी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत पारितोषिक मिळाल्यानंतर अभिनयाविषयीचा आत्मविश्वास वाढला. याच काळात लिखाणाचा आत्मविश्वासही असे सांगत अभिनेते प्रभावळकर यांनी दिग्दर्शकांच्या विश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. 'लगे रहो मुन्नाभाई'मध्ये गांधीजींची भूमिका करताना प्रचंड दडपण होते. मी गांधीजींवरील पुस्तके वाचली, भाषणे ऐकली, तयारी केली. लोक मला गांधी म्हणून स्वीकारतील का, अशी भीती होती; मात्र चित्रपट प्रचंड यशस्वी ठरला. या चित्रपटाचे खरे नायक हे दिग्दर्शक राजू हिरानी आहेत. या एका चित्रपटाने त्या काळात





मदत केली. विशेषत: मी कोणताही अभिनय करत नसतो त्यावेळी मी स्वतः चाच अभिनय करत असतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी यावेळी केले.

अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ, अष्टपैलू अभिनेते दिलीप प्रभावळकर यांची दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांनी घेतलेली प्रकट मुलाखत रसिकांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाली. या संवादातून प्रभावळकर यांनी आपल्या आयुष्यातील प्रवास, संघर्ष, निर्णयप्रक्रिया, निर्माण झाला आणि स्वतःला शोधण्याची प्रक्रिया सुरू झाली. मला मुंबईतील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये दाखल होऊन संशोधक व्हायचे होते. मात्र, तिथे मी जाऊ शकलो नाही. त्यानंतर मी फार्मास्युटिकल कंपनीत नोकरी केली; मात्र अभिनयाची ओढ मला कायम होती. कोणतीही सवलत न घेता नोकरी करत असतानाच मी माझा अभिनयाचा प्रवास करीत होतो. वयाच्या चाळिशीनंतर मी पूर्णवेळ अभिनेता होण्याचा निर्णय घेतला.

वृद्ध व्यक्तिरेखा तरुण वयापासून साकारत आलो, देशभर 'गांधीगिरी'ची लाट आली होती.

रंगमंच, चित्रपट आणि माध्यमांच्या भिन्नतेविषयी बोलताना अभिनेते प्रभावळकर म्हणाले, नाटकात प्रमाणबद्धता आवश्यक असते. सिनेमात मी दिग्दर्शकाला शरण जातो; सिनेमा हे दिग्दर्शकाचे माध्यम आहे. महाविद्यालयीन काळातील अनुभवांनी लिखाणाची दिशा मिळाली. प्रकाशक आणि संपादकांनी मला लिहायला प्रवृत्त केले. 'गुगली' हे माझे पहिले पुस्तक असून आजवर मी ३१ पुस्तके लिहिली आहेत.

# गांधीजीचे विचार आज मरत चालले की काय?

जगात खास करुन दोन लोकांचा जास्त अभ्यास केला जातो.एक म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व दुसरे राष्ट्रपिता महात्मा गांधी.हे दोघंही गौतम बुद्धाच्या विचाराने प्रेरीत झालेले दिसतात.

रणाविण स्वातंत्र्य जर कोणाला मिळाले तर त्यात पहिला क्रमांक भारताचा लागतो.भारतात मुळात दोन गट होते.ज्यावेळी ब्रिटीशांचं राज्य होतं.या ब्रिटीशांना हाकलण्यासाठी देशातील देशभक्ताचे जे दोन गट पडले.त्या गटाला जहाल व मवाळ गट म्हणत.जहाल गट हा क्रांतीकारी गट होता.मरेल पण सत्यच बोलेल आणि मरेल पण मारुन मरेल.मार खावून मरणार नाही.अशा विचारांचा गट.हा गट ब्रिटीशांना असहकार दाखवत होता.तर दुसरा गट मवाळ गट होता.ह्या गटाचं म्हणणं होतं की जर आपण इंग्रजांना मदत केली,विरोध केला नाही तर एक दिवस इंग्रजांना दया येईल व तो आपल्याला एक दिवस देश चालवायला देवून जाईल.

महात्मा गांधी येण्यापूर्वी इथे आगरकर हे मवाळ गटाचे तर टिळक हे जहाल गटाचे नेते होते.

टिळकांनी वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरुन जनतेत इंग्रजांविरुद्ध असंतोष भारतीय मनात निर्माण केला होता.त्यांनी देशात शिवजयंती गणेशोत्सव सुरु केला होता.त्यांनी स्वदेशी,शिक्षण स्वराज्य आणि बहिस्कार ही चतुसुत्री मांडून जनतेला चेतविले.त्यांनी मंडालेच्या तुरुंगात शिक्षाही भोगल्या.पण ते फार काळ जीवंत राहिले नाही.एक ऑगस्ट १९२० ला ते मरण पावले.त्यांच्या निधनानंतर देश साधारणतः पोरका झाला होता.आता कोण?देश वाली शोधत होता.अशावेळी या देशाचं नेतृत्व स्विकारलं ते महात्मा गांधी यांनी.

महात्माजींनी बार्डोलीचा सत्याग्रह केला होता.तसेच ते बॅरीस्टर पदवीने विभुषीत असून त्यांनी आफ्रीकेत शेतक-यांसाठी केलेले आंदोलन. चंपारण्याचा सत्याग्रह इत्यादी गोष्टी त्यांनी सहज हाताळल्या होत्या. त्यामुळं या नेतृत्वहिन व पोरक्या झालेल्या समाजाला टिळकानंतर महात्मा गांधीनी नेतृत्वाची आस दाखवली.त्यांनी वेगवेगळ्या मार्गाने का होईना या देशातील समस्त बांधवांना एकत्र आणलं.नव्हे तर असहकार आंदोलनातून,सविनय कायदेभंगातून त्यांनी स्वातंत्र्याची जी ज्योत पेटवली.ती ज्योत वाखाणण्याजोगी आहे.आज आपण भारतीय बहुसंख्य असलो तरी इंग्रजी फौजेसमोर आपला टिकाव लागू शकत नाही हे महात्माजींनी ओळखलं.कारण इंग्रजांजवळ अत्याधुनिक शस्त्रास्त्रे होती.तसेच त्यांच्याकडे आपलीच भारतीय माणसे नोकरी करीत होती.हे इंग्रज एवढे धुर्त होते की ते आपल्याच माणसांकडून आपल्यावरच हल्ला करुन आपल्याच माणसांना नेस्तनाबूत करीत होती.हे मात्र आपल्याच माणसांना कळत नव्हते. जर क्रांतीकारी मार्ग अवलंबला असता तर भारतीय माणसे केव्हाच संपली असती.म्हणून महात्माजींनी अहिंसेच्या मार्गाने इंग्रजांशी लढा द्यायचे ठरवले.त्यांनी लढाईची हत्यारे बनवली.ती हत्यारे म्हणजे सत्य,अहिंसा,सत्याग्रह,असहकार ही होय.गौतम बुद्धांनी सांगितलेला अहिंसा ह्या तत्वाने तर बुद्धाने सा-या जगाला जिंकलं होतं.हे महात्माजींना माहीत होतं.

आज देश स्वतंत्र्य झाला ती महात्मा गांधीजींचीच देण.आजही देशाला त्यांच्या विचारांची गरज आहे.मरण आलं तरी चालेल,पण मी सत्यच बोलणार हा त्यांचाच संदेश.आजही न्यायालयात याच विचाराने शपथ घेतली जाते.गीतेची शपथ टाकली जाते.मी शपथ घेतो की मी न्यायाधीशासंमोर सत्य बोलेल,खोटं बोलणार नाही.मग बयाणं विचारली जातात.तेव्हा साक्ष द्यायला आलेले लोकं चिकार खोटं बोलतात.शपथ गेली खड्ड्यात. शिवाय वकीलही सर्रास खोटं बोलून केस जिंकून जातात.सत्य पदोपदी मरतं.ही वास्तविकता आहे. आजच्या काळात न्यायालयच नाही तर जागोजागी सत्य चालत नाही. खोटं बोलल्याशिवाय भागत नाही. पोट भरता येत नाही.मग सत्य तरी कोण बोलेल!

आज मितीला जागोजागी रावणाचेच राज्य आहे.रावण तरी बरा होता,पण आज जागोजागी रावण पसरलेले आहेत.कोणी फितूरी करतात.कोणी अत्याचार करतात,कोणी बलत्कार करतात तर कोणी दवाखान्यातच मानवी अवयवाची तस्करी.सर्वत्र खोटं बोलून.....खोटा व्यवहार करुन.

आज देशात कायदेही असेच आहेत.न्यायालयातून आरोपी मोकाट सुटतात तर इमानदार शिक्षेच्या कक्षेत अडकतात.महात्माजींनी तर सविनय कायदेभंग करुन मिठाचा एकच कायदा मोडला.पण आज देशात कितीतरी कायदे मोडावेसे वाटतात.देश स्वतंत्र असला तरी.महात्माजींनी असहकार दिलं वाईट लोकांना मदत करु नये हाच या असहकाराचा उद्देश.पण आज या असहकाराचा अर्थ आम्ही वेगळाच घेतला.तो म्हणजे चांगल्या गोष्टीला सहकार्य करु नये वाईट गोष्टीला आम्ही सहकार्य करतो. तसेच महात्माजींनी सांगितलेले सत्याग्रह अर्थात आंदोलन. आम्ही हेही आंदोलन आमच्या स्वतःच्या स्वार्थासाठी करतो.

पर्यायाने सांगायचे झाल्यास आम्ही महात्मा गांधीच्या विचारांची हत्या करीत आज सुटलेलो आहोत. आज आमची बेटी सुरक्षीत नाही.ते इंग्रज तर देश सोडून गेले आपला. पण या देशावर हे भलतेच इंग्रज येवून बसलेत.जे राज्य तर करीत आहेत.पण त्यांना सर्वसामान्यांचा विचार नाही.त्यामुळंच महात्मा गांधीच्या विचारांची आज हत्या होत असलेली दिसत आहे नव्हे तर त्यांचे विचार मरत चाललेले दिसतात.विशेषतः सांगा.

सांगायचे झाल्यास महात्मा गांधी की ज्यांनी ह्या देशाला स्वतंत्र्य करण्या महत्वपुर्ण योगदान दिलं. त्या महात्मांजींनाच मारायला या देशातील समस्त बांधवांनी मागे पुढे पाहिले नाही.त्या देशातील माणसे,महात्मा गांधी कितीही महान असले तरी त्यांचे विचार मांडणार काय?ही विचार करायला लावणारी बाब आहे.खरंच महात्माजींचे विचार मरत चालले आहेत,जे विचार या देशासाठी क्षणोक्षणी महत्वाचे आहेत याचाही विचार या देशातील लोकांनी करावा.तेच त्यांच्यासाठी खरी श्रद्धांजली ठरेल.

**- अंकुश शिंगाडे नागपूर**

## संक्षिप्त

### शासनमान्य ग्रंथ निवड यादीसाठी ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी 'ग्रंथभेट' योजने अंतर्गत सन २०२५या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात. या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रंथाची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या 'शासनमान्य ग्रंथ निवड यादी' मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२५ या कॅलेंडर वर्षात ( दि. १ जानेवारी २०२५ ते दि.३१ डिसेंबर २०२५) प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दिनांक २८ फेब्रुवारी पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त ग्रंथांचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. या यापूर्वी संचालनालयास पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही.

तसेच, मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधीत ग्रंथालयाकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनालयास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथासोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. सर्व लेखक, प्रकाशक यांनी ग्रंथ पाठवावे असे आवाहन ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी कार्यालयात श्रद्धांजली

# 'वेळेचं महत्त्व जाणणारा नेता'

## जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितली दिवंगत नेत्याची थोरवी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्यातून निघून गेला, अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड अजित पवार यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी स्वामी यांनी पुष्पहार अर्पण केला.






हे प्रशासनाची जाण असणारे नेते होते. वक्तशीरपणा हा त्यांच्या ठायी होता. वेळेचं महत्त्व जाणणारा एक मोठा नेता श्रद्धांजली अर्पण केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आज जिल्हाधिकारी कार्यालयात श्रद्धांजली अर्पण केली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

त्यानंतर बोलतांना जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की , प्रशासनाची जाण असणारा एक मोठा नेता म्हणून अजितदादा सगळ्यांच्या स्मरणात राहतील. समाजातील सर्व थरातील लोकांशी त्यांचा थेट संपर्क होता. प्रश्नांची जाण असणे, ते सोडविण्यासाठी अथक परिश्रम करण्याची तयारी असणे हे त्यांचे महत्त्वाचे गुण होते. वक्तशीरपणा हा त्यांच्या ठायी होता. वेळेचं महत्त्व जाणणारा नेता आपण गमावला आहे, अशा शब्दात जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिवंगत नेत्याची थोरवी सांगितली.

निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी- कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनाई आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी** /आगामी कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी जनार्दन विधाते यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.१२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत हे आदेश अमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## अमृत कौशल्य उद्यम प्रशिक्षण योजनेंतर्गत मोफत प्रशिक्षणासाठी नावनोंदणी सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ राज्य शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी विविध मोफत व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अमृत कौशल्य उद्यम प्रशिक्षण योजनेंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे विविध प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी नावनोंदणी सुरू करण्यात आली आहे.

लक्षित गटातील युवक व युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा व्यवस्थापक अक्षय लंबे यांनी केले आहे.

या प्रशिक्षण योजनांमधून प्रशिक्षणार्थ्यांना स्वयंरोजगार सुरू करण्यास तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

या योजनेअंतर्गत अमृत उद्योग कौशल्यवर्धन, अमृत सूर्य मित्र, सोलार इन्स्टॉलेशन टेक्निशियन, अमृत आरीवर्क, अमृत ग्लॅमर (ब्युटी पार्लर), अमृत बेकरी तसेच अमृत आयात-निर्यात प्रशिक्षण असे विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असून, हे सर्व प्रशिक्षण कार्यक्रम पूर्णतः मोफत आहेत. अमृत संस्था ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था असून, खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना इतर कोणत्याही शासकीय संस्था किंवा महामंडळांच्या योजनांचा लाभ मिळत नाही, अशा जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक हा अमृत संस्थेचा लक्षित गट आहे.

यामध्ये ब्राह्मण, कोमटी, मारवाडी, ठाकूर, गुजराती, सिंधी, कायस्थ, जाट, बणिया, बंत्स, नायर, अय्यंगार, पाटीदार, बंगाली, पटेल, येलमार, त्यागी, सेनगुनथर, राजपुरोहित, नायडू, भूमिहार, हिंदू नेपाळी, कानबी, एलमार आदी जातींचा समावेश आहे.

या जातींमधील वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेले नागरिक अमृत संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेऊ शकतात.

इच्छुक उमेदवारांनी वेळ न दवडता अमृत कार्यालयाशी संपर्क साधून या प्रशिक्षण योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहिती व नावनोंदणीसाठी अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा.


### कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना

जा.क्र.२०२०/ नपप/ नामांतर नोंद/ जा.क्र./ कावि

दिनांक: ०१/१/२६

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार **जया राजकुमार नाईक** रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांनी नामे - ता.परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र.( ) दि. २३/१२/२०२५ सत्य प्रत जोडून आवक क्र. दि./ / रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती सा. न. नि. सो. परतूर जया राजकुमार नाईक परतूर जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्व्हे नं. (१४३/२) ज्याचा मिळकत क्र. ( ) चे भूखंड क्र. (८-) मधील क्षेत्र ज्यांची चतु: सिमा -

पुर्व - ६ मीटरचा रोड
पश्चिम - प्लॉट क्र. 7A
दक्षिण - प्लॉट क्र. 8B
उत्तर - प्लॉट क्र. 7B


या वरील चतु: सिमा मधील क्षेत्र (१८.२४ द ९.१४ मीटर) चौमी जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्यधिकारी**
**नगर परिषद परतूर**


## तालुक्यात यूपीआय पेटीएम कंपनीच्या एजंट मार्फत यूपीआय अकाउंट खोलून देतो असे म्हणून दुकानदारांची लूट

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/ सुभान शहा/** गंगापूर तालुक्यामध्ये अनेक टोळ्या सक्रिय झाल्या आहे. यूपीआय पेटीएम बँक अकाउंट खोलून देतो असे म्हणून ग्राहकांची फसवणूक करण्याचे काम सुरू आहे. पेटीएम कंपनीच्या एजंट मार्फत दुकानदारांची फसवणूक होत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. गंगापूर तालुक्यामध्ये मागील काही दिवसापासून पेटीएम बँक अकाउंट तुम्हाला ओपन करून देतो असे बोलणारे एजंट दुकानदाराकडे जातात आणि त्यांना काही महिन्यासाठी मोफत स्कीम चालू आहे असे बोलून त्यांना फसवण्याचे काम करत असल्याची चर्चा आहे. असे एजंटांकडून सावधानी बाळगण्याची आवश्यकता दुकानदारांना आहे. यूपीआय पेटीएम कंपनीच्या एजंट मार्फत दुकानदारांची सर्रासपणे फसवणूक होत आहे. त्याला तात्काळ प्रशासनाने फसवणूक करणाऱ्यां एजंट यांची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. एजंटांकडून दुकानदारांना बोलण्यात येते की




काही महिन्यासाठी पेटीएम कंपनीकडून मोफत सुविधा चालू आहे. महिन्याला फक्त एक रुपया चार्जेस लागेल एक्स्ट्रा चार्जेस लागणार नाही तुमची कोणतीही फसवणूक होणार नाही. असे विश्वासात घेऊन ग्राहकांची फसवणूक करण्याचे काम पेटीएम कंपनीकडून एजंट मार्फत ग्राहकांची लूट सुरू आहे. प्रशासन आता पुढे काय भूमिका घेणार फसवणूक करणाऱ्या ग्राहकांना न्याय मिळणार का? यूपीआय कंपनीच्या एजंटांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई होणार का? याकडे सर्व सामान्याचे लक्ष लागले आहे.

## चिंचोली येथे विधवा, वृद्ध व सर्वसमावेशक स्त्रीत्वाचा सन्मान

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील गृहविज्ञान विभाग व आजीवन शिक्षण व विस्तार विभाग कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लिं)यांच्या वतीने चिंचोली लिं येथे हळदीकुंकू निमित्ताने महिलांची रजोनिवृत्ती व उपाययोजना या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ.वंदना बनकर व डॉ. प्रतिभा आघार्डे मार्गदर्शक डॉ. स्वप्ना देवरे (स्त्रीरोग तज्ञ) व डॉ.वंदना बनकर तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.अनिता खंडागळे या होत्या. या हळदी कुंकू निमित्त गावातील वंदना पवार, विधवा, वृद्ध व सर्व




समावेशक स्त्रिया मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. डॉ. वंदना बनकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की रजोनिवृत्तीच्या दरम्यान योग्य आहार व योग्य व्यायाम करावा. डॉ. स्वप्ना देवरे यांनी रजोनिवृत्तीचे चे लक्षण सांगून त्या काळातील बदलांना न घाबरता ती एक प्रक्रिया समजून आनंदाने सामोरे जा व उतारवयात आनंदी राहा असे सांगितले. वविधवेच्या सन्मानावर आधारित महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी माधुरी भुजंग व कावेरी ढवळे यांनी पथनाट्य सादर केले. हळदी कुंकवासाठी आलेल्या सर्व महिलांसाठी उखाणे व इतर स्पर्धा घेण्यात आल्या बक्षिस स्वरूपात कडधान्य देण्यात आले. हळदीकुंकू व आरोग्याचे वाण देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या सर्व कार्यक्रमासाठी सायली बीलंगे व रोहिणी बिलंगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.प्रतिभा आघार्डे व सौ शुभदा कुलकर्णी यांनी केले.


### कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना

जा.क्र.२०२०/ नपप/ नामांतर नोंद/ जा.क्र./ कावि

दिनांक: ०१/१/२६

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार फारुख शेख मुक्तार रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांनी नामे --- ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद / नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. (-) दि. ५/१२/२०२५ सत्य प्रत जोडून आवक क्र. --- दि. ६/१२/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री / श्रीमती रहीम उस्मान शेख रा. परतूर जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. (-) ज्याचा मिळकत क्र. (९८५) चे भुखंड क्र. (-) मधील क्षेत्र ज्यांची चतु:सिमा -

**पुर्व - लिहून देणार याची जागा**
**पश्चिम - रेश्माबी उस्मान शेख**
**दक्षिण - मिळकत ७**
**उत्तर - १५ फुटाचा रस्ता**

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (20x20 फूट) जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्यधिकारी**
**नगर परिषद परतूर**


## लासूर स्टेशन येथील ग्रामदैवत गणपती बाप्पाच्या चरणी महाविकास आघाडी व वंचित यांनी प्रचारार्थ फोडला नारळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर प्रतिनिधी** / गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे महाविकास आघाडीच्या हर्सूल सावंगी जिल्हा परिषद गट व माळीवाडगाव,सावंगी पंचायत समिती गणाच्या निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ आज शुक्रवारी लासूर स्टेशनचे ग्रामदैवत गणपती बाप्पाच्या चरणी नारळ अर्पण करून भव्य दिव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते रैलीत सर्वाधिक महिलांची उपस्थिती होती. दरम्यान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, तालुकाध्यक्ष सूर्यकांत गरड,जिल्हा परिषदच्या उमेदवार अमृता आमराव,सावंगी पंचायत समिती गणाचे उमेदवार संदीप गायकवाड तर माळीवाडगाव गणाच्या उमेदवार लताबाई किशोर पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान प्रचाराचा नारळ काँग्रेसचे जिल्हाअद्यक्ष किरण पाटील डोणगावकर, तालुकाध्यक्ष सूर्यकांत गरड,वंचितचे उपजिल्हा अध्यक्ष अनिल चंडालिया,जिल्हासचिव संदीप गायकवाड,काँग्रेसचे तालुका सचिव रिचर्ड बत्तीसे,शिवसेना (उबाठा) गटाच्या रोहिणीताई देवके, बाळासाहेब,आमराव,ज्ञानेश्वर,वाघचा ैरे,भास्करराव,बन्सोड,पवन, साळवे, गोविंद,शेलार,दिक्षा,गायकवाड,मोहन खंडागळे,किशोर पवार,समाजसेवक अशोक किर्तिकर यांच्यासह शेकडो महिलाची उपस्थिती होती.महाविकास आघाडीच्या तिन्ही उमेदवारांना विजयी करा.

काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष किरण पाटील डोणगावकर यांचे मतदारांना आवाहन दरम्यान प्रचाराचा नारळ फोडल्यानंतर जनसमुदायला संबोधित करताना किरण पाटील डोणगावकर म्हणाले की महाविकास आघाडीच्या



जिल्हा परिषदच्या उमेदवार अमृता आमराव,सावंगी पंचायत समिती गणाचे उमेदवार संदीप गायकवाड तर माळीवाडगाव गणाच्या उमेदवार लताबाई पवार यांना विजयी करावे असे आवाहन करण्यात केले...

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीच्या २०२६ च्या रणधुमाळीत सावंगी गटातील जिल्हा परिषद व पंचायत समितीचे राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलताना दिसत आहेत. शिवसेना उबाठा आणि वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस पार्टी कडून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या सावंगी गटातून अमृता आमराव व पंचायत समिती गणातून वंचित चे संदीप गायकवाड तर माळीवाडगाव गणाच्या सौ. लताबाई किशोर पवार यांच्या झंझावाती प्रचाराने प्रस्थापित पक्षांचे धाबे दणाणले असून, सावंगी गटातील जनतेचा महाविकास आघाडी व वंचित बहुजन आघाडीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रस्थापितांच्या 'आश्वासनांची खैरात' विरुद्ध 'कामाचे राजकारण' गेल्या अनेक दशकांपासून सत्ताधाऱ्यांनी केले आहे आणि सत्ता भोगली, मात्र गाववासीयांचे मूलभूत सुविधा प्रश्न आजही 'जैसे थे'च आहेत. विकास कामाच्या नावावर गप्पा ठोकणाऱ्या सत्ताधाऱ्यांना मतदार आता घरचा रस्ता दाखवल्याशिवाय राहणार नाही ..-

**(वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल चंडालीया)**

# स. भु. प्रशालेतील सर्वेश मगरेला संस्कृत ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**/ जालना येथील श्री स. भु. प्रशाला येथे अखिल भारतीय संस्कृत ऑलिम्पियाड परीक्षा २०२५ दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल २४ जानेवारी २०२६ रोजी जाहीर झाला. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी शाळेत आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

या परीक्षेसाठी शाळेतील इयत्ता आठवी ते दहावीचे एकूण ७६ विद्यार्थी सहभागी झाले होते. इयत्ता आठवीतून ७ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक, २ विद्यार्थ्यांनी रजत पदक, तर २ विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ३०० रुपयांचे पारितोषिक मिळवले. इयत्ता नववीतून ३ विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले. यामध्ये सर्वेश मगरे याने इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांमधून तसेच संपूर्ण शाळेतून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले. नववीतील इतर ४ विद्यार्थ्यांना रजत पदक, तर १ विद्यार्थ्याला ३०० रुपयांचे पारितोषिक मिळाले.

# महाराष्ट्राचा 'दादा' हरपला; अंबड येथे अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय भावपूर्ण श्रद्धांजली

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड प्रतिनिधी/ गणेश सपकाळ/** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांचे बारामती येथे झालेल्या विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले.

या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रासह जालना जिल्ह्यावरही शोकाकळा पसरली आहे. आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी आणि श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी अंबड येथे ३० जानेवारी रोजी भव्य सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

**महात्मा फुले चौकात शोकाकुल वातावरण**

अंबड येथील महात्मा फुले चौक (चक्री चौक) येथे सकाळी १०:३० वाजता ही शोकसभा पार पडली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अजितदादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी उपस्थित अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते.

**नेत्यांच्या भावना: एक कणखर नेतृत्व गमावले**

शोकसभेला उपस्थित असलेल्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

अजितदादा हे केवळ एक नेते नव्हते, तर ते प्रशासनावर पकड असलेले आणि धाडसी निर्णय घेणारे विकासपुरुष होते. त्यांच्या निधनाने राजकारणात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे, अशा शब्दांत नेत्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**उपस्थित मान्यवर:**

या शोकसभेला राजकीय, सामाजिक आणि व्यापारी क्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते, ज्यात प्रामुख्याने:

राजकीय नेते: माजी मंत्री राजेश भैय्या टोपे, आमदार नारायणजी कुचे, माजी सभापती प्रभाकर मामा पवार, बप्पासाहेब गोल्डे, जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख.

**स्थानिक पदाधिकारी:** नगराध्यक्ष केदार दादा कुलकर्णी, उपनगराध्यक्ष विश्वजीत खरात, विवेक भैय्या चोथे, सतिश होडे, संदीप दादा खरात.

इतर मान्यवर: प्राचार्य भागवतराव कटारे, बाबासाहेब इंगळे, रविंद्र तात्या तौर, सुदाम बप्पा मुकणे, चंद्रकांत कारके, तसेच वकील, डॉक्टर, पत्रकार आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**सामूहिक प्रार्थना आणि समारोप**

अंबड तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या नेत्याला 'भावपूर्ण श्रद्धांजली' अर्पण केली. सभेच्या शेवटी, मृताच्या आत्म्यास शांती लाभो आणि पवार कुटुंबाला हे अतीव दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

# इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बदनापुरचे प्रा. फोके यांना पीएच.डी. (फार्मसी) पदवी

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर प्रतिनिधी**/ बदनापूर येथील पाथ्रीकर कॅम्पस येथील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे कार्यरत असलेले प्रा.संदीप विश्वनाथ फोके यांनी सनराईज विद्यापीठ,अलवर (राजस्थान) येथून डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) फार्मसी ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी यशस्वीरीत्या प्राप्त केली आहे.

## कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना

जा.क्र.२०२०/ नपप/ नामांतर नोंद/ जा.क्र./ कावि
दिनांक: ०९/१/२६

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार **विजय कुंडलिकराव डवरे** रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांनी नावे प्रमोद सूरजमल बोरा रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. ( ) दि. ३१/१२/२०२५ सत्य प्रत जोडून आवक क्र. कोरे दि. ३१/१२/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री / श्रीमती --- रा. परतूर जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ( ) ज्याचा मिळकत क्र.(-) चे भुखंड क्र. (-) मधील क्षेत्र ज्यांची चतु:सिमा –

**पुर्व : ७ मीटरचा डी पी रोड**
**पश्चिम : प्लॉट क्र. १८**
**दक्षिण : प्रमोद बोरा व विकास व्यास**
**उत्तर : प्लॉट क्र. १०**

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (114.63) चौमी जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्रांच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रकटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्यधिकारी**
**नगर परिषद परतूर**

## कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना

जा.क्र.२०२०/ नपप/ नामांतर नोंद/ जा.क्र./ कावि
दिनांक: ०१/१/२६

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार **ज्योती किरण तुळसकर** रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांनी नावे - रा. - ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. (-) दि. ४/७/२०२५ सत्य प्रत जोडून आवक क्र. - दि. / / रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती मधुराबाई रावसाहेब देशमुख रा. परतूर जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्व्हे नं. (-) ज्याचा मिळकत क्र. १०६५ चे भूखंड क्र. (-) मधील क्षेत्र ज्यांची चतु:सिमा –

**पुर्व : अंतर्गत रस्ता**
**पश्चिम : पुंजाराम कोल्हे**
**दक्षिण : दिनेश मुंदडा**
**उत्तर : रस्ता**

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (30x40 फु.) ची जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्यधिकारी**
**नगर परिषद परतूर**

## कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना

जा.क्र.२०२०/ नपप/ नामांतर नोंद/ जा.क्र./ कावि
दिनांक: २१/१/२६

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **खाजा चांद कुरेशी** रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांनी नामे नसीरोद्दीन नासेरोद्दीन खतीब रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. (७६) दि. ६/१/२६ सत्य प्रत जोडून आवक क्र. ७६ दि. २०/१/२६ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री / श्रीमती ---रा. परतूर जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्वे नं. (२५०/१) ज्याचा मिळकत क्र.( – ) चे भुखंड क्र. (०४) मधील क्षेत्र ज्यांची चतु:सिमा –

**पूर्व : ८ मिटर रोड**
**पश्चिम : शाह फैसल कुरेशी यांची मालमत्ता**
**दक्षिण : प्लॉट नं. ०३**
**उत्तर : प्लॉट नं. ०५**

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (75.09 चौ.मी.) ची जमीन खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रकटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्यधिकारी**
**नगर परिषद परतूर**

## कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना

जा.क्र.२०२०/ नपप/ नामांतर नोंद/ जा.क्र./ कावि
दिनांक: १९/१/२६

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार अनवर युसुफ बागवान रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांनी नावे इरफान बेगम शफिक बागवान रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. (२४७) दि. १३/०१/२६ सत्य प्रत जोडून आवक क्र.- दि. १६/१२/२६ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री / श्रीमती इरफान बेगम शफिक बागवान रा. परतूर जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्वे नं.(-) ज्याचा मिळकत क्र.(३५५/२) चे भुखंड क्र.(-) मधील क्षेत्र ज्यांची चतु:सिमा –

**पूर्व: शेख सुलताना रो युसुफ यांची मालकी**
**पश्चिम: वखार मडगाव रोड**
**दक्षिण: अंतर्गत रस्ता** **उत्तर: हाजी मुस्तफा यांचे घर**

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (४० द ३० फूट) चौमी जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्रच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रकटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्यधिकारी**
**नगर परिषद परतूर**

## कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना

जा.क्र.२०२०/ नपप/ नामांतर नोंद/ जा.क्र./ कावि
दिनांक: २०/१/२६

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सरुबाई सखाराम आक्काड, राहणार परतूर, ता. परतूर जि. जालना यांनी सखाराम धारू आक्काड, राहणार परतूर, ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद / नामांतर करणे बाबत वारस प्रमाणपत्र जोडून अर्ज सादर केला आहे.

त्या अर्थी श्री/श्रीमती (सरुबाई आक्काड) यांच्या नावावर असलेला मालमत्ता क्र. ८७०/४ चे भूखंड क्र. ( – ) मधील क्षेत्र ज्यांची चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे.

**पूर्व : न.प. रोड**
**पश्चिम : मोरे यांचे घर**
**दक्षिण : मोरे यांचे घर**
**उत्तर : न.प. रोड**

या वरील चतु:सीमा मधील क्षेत्र (20 x 30) चौ.मी. जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्रांच्या पुराव्यासह या कार्यालयात आक्षेप अर्ज दाखल करावा.

नस्ता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करिता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्यधिकारी**
**नगर परिषद परतूर**

## कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना

जा.क्र.२०२०/ नपप/ नामांतर नोंद/ जा.क्र./ कावि
दिनांक: १९/१/२६

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार **रामेश्वर काकासाहेब भुंबर** रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांनी नामे ----रा. --- ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद / नामांतर करणे बाबत रजिष्टर दस्त क्र. ( ) दि. २७/५/२०२५ सत्य प्रत जोडून आवक क्र. --- दि. / / रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री / श्रीमती सोपान काकासाहेब भुंबर रा. परतूर जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ( ) ज्याचा मिळकत क्र. (३६७) चे भुखंड क्र. ( ) मधील क्षेत्र ज्यांची चतु:सिमा –

**पुर्व - लिहून देणार यांची उर्वरित जागा**
**पश्चिम - रस्ता**
**दक्षिण - लिहून देणार यांची उर्वरित जागा**
**उत्तर - संतोष हरकळ यांची मालमत्ता**

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (40x25 फुट) चौ.मी. जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्यधिकारी**
**नगर परिषद परतूर**

## कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना

जा.क्र.२०२०/ नपप/ नामांतर नोंद/ जा.क्र./ कावि
दिनांक: १९/१/२६

**जाहीर प्रकटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार **रूखसाना शेख जलील** रा. परतूर ता. परतूर जि. जालना यांनी नामे --- रा. ---ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. ( ) दि. ६/१२/२०२५ सत्य प्रत जोडून आवक क्र. दि. ६/१२/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री / श्रीमती रहीम उस्मान शेख रा. परतूर जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सव्हे नं. ( ) ज्याचा मिळकत क्र. (१७४/-) चे भूखंड क्र. ( ) मधील क्षेत्र ज्यांची चतु: सिमा –

**पुर्व - लिहुन देणार यांची जागा**
**पश्चिम - १५ फुटाचा रस्ता**
**दक्षिण - मिळकत क्र. ७**
**उत्तर -१५ फुटाचा रस्ता**

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (२०००) चौ.मी. जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरी/-**
**मुख्यधिकारी**
**नगर परिषद परतूर**

## उप-विभागीय कार्यालय उपजिल्हाधिकारी (अतियात) परतूर जि. जालना

सत्यमेव जयते

जा.क्र. २०२५/इनाम/विरासत/कावी-
**उपजिल्हाधिकारी (अतियात) परतूर जि. जालना**
दिनांक: १३/०१/२०२६

**जाहिर प्रगटन**

ज्या अर्थी **दीपक रेणुकादास दीक्षित** रा. दिक्षीत गल्ली, परतूर ता. परतूर जि. जालना यांनी दिनांक ०४/०९/२०२५ रोजी या कार्यालयास विहीत नमुन्यात अर्ज सादर करुन त्यांचे नावे विरासत मंजुरीची कार्यवाही करणे करता विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात यापूर्वी विरासत क्र. १/५८ दि. १९५२ रोजी अर्जदार यांच वडील नामे भगवान रघुनाथ दिक्षीत व रेणुकादास भगवान दीक्षित यांचे नावे विरासत मंजुरीची कार्यवाही झालेली आहे. मात्र मुळ इनामदार गांबर भगवान रघुनाथ दिक्षीत हे दिनांक १०/१२/१९८६ रोजी मयत झालेले आहेत.

प्रस्तुत इनाम जमीनीचा तपशिल खालील प्रमाणे अर्जदाराने अर्जात नमुद केलेला आहे.

| अ.क्र | गावाचे नाव | देवस्थानचे नाव | सर्व्हे नंबर / क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | परतूर ता. परतूर | मातापुरी देवी मंदीर, परतूर | १५/२ (०१ हे ६९ आर) | - |

त्या अर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद मिळकती बाबत किंवा सदरचे विरासत मंजुरीचे कार्यवाही बाबत जर कोणास काही आक्षेप अगर हरकत असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन ६ आठवडयाच्या आत आपला आक्षेप अगर हरकत लेखी स्वरुपात या कार्यालयात दाखल करावी.

उपरोक्त नमुद मुदतीत कोणाचा आक्षेप अगर हरकती प्राप्त न झाल्यास वरील अर्जदार यांचे नाव त्यांनी विनंती केल्याप्रमाणे उपरोक्त मिळकती बाबत नियमानुसार विरासत मंजुरीची कार्यवाही करण्यात येईल व तद्नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप अगर हरकत विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०१/२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्कयानीशी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दी करीता दिलेले आहे.

जा.क्र.जिमाका/जालना/जाहि./४३/२०२६

**स्वाक्षरीत/-**
**(पद्माकर गायकवाड)**
**उपजिल्हाधिकारी (अतियात) परतूर जि. जालना**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२११२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247

The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813